**प्रस्तावना :-** **घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी प्रमाणे शहर क्षेत्रातील दंडात्मक कारवाई करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांना सादर केलेल्या मनपा हिस्सा म्हणून ५५ % व उर्वरित ४५ % संस्था स्वतःचा खर्च भागवणार या दरास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा(नियंत्रण) कायदा २००६ च्या कलम ४ पोटकलम(१) व (२) च्या अनुषगांने महाराष्ट्र शासनाने प्लास्टिक व थर्माकोल इत्यादी पासुन बनविलेल्या अविघटनशील वस्तूंच्या उत्पादन,वापर,विपरीत,वाहतूक यावर बंदी आणणेकामी महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचना क्रं.प्लास्टीक २०१८/प्र.स.२४/तां.कं.४ दि.२३/३/२०१८ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन प्राप्त मंजुरी नुसार भिवंडी मनपाच्या कार्यक्षेत्रात स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती करुन दंडात्मक कार्यवाही करणेसाठी मनपाचे मनुष्यबळ कमी पडत असल्याने व मा.महासभा ठराव क्रं.३ दि.२४/७/२०१७ अन्वये दंडात्मक कार्यवाही करणेकामी त्रसंस्था नियुक्त करणेसाठी एक वर्षाच्या कालावधी करिता रु.७० लक्ष इतका खर्च येत असुन होणा-या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता प्राप्त झाली असुन त्रसंस्था नियुक्त करणेसाठी बाजार भावातील दर प्राप्त होणे करिता ऑनलाईन निविदा मागविण्यात आले असता याकामी १ निविदाकार यांनी सहभाग घेतला असुन प्राप्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजांची छाननी मा.निविदा समिती समक्ष सादर करण्यात येवुन लिफाफा क्र.२ खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे एकुण खर्च प्राप्त झाला आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | मे.रेयान इंटरप्रायजेस, अंबरनाथ |
|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन,स्वच्छ भारत अभियान अंतर्गत भिवंडी शहर अस्वच्छ करणा-या नागरिकांवर कारवाई करुन दंड वसुल करणेकरिता मा.महासभा ठराव क्र.३, दि.२४/०७/२०१७ अन्वये दिलेल्या उपविधीच्या मान्यतेनुसार कडक कार्यवाही करणे बाबत. | मनपाचा हिस्सा - ५५ %<br>संस्थाचा हिस्सा - ४५ % |

वरील प्रमाणे दरांचे अवलोकन केले असता याकामी सर्वात कमी दर हे मे.रेयान इंटरप्रायजेस, अंबरनाथ.यांनी सर्व खर्च भागवून मनपा हिस्सा ५५% व संस्थाचा हिस्सा ४५ % करिता एका वर्षाच्या कालावधी असा खर्च सादर केले आहेत.

तथापि आरोग्य व स्वच्छता विभागा मार्फत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी प्रमाणे शहर क्षेत्रातील दंडात्मक कार्यवाही करणेकामी त्रसंस्था नियुक्त करणेसाठी एक वर्षाच्या कालावधीकरिता रु.७० लक्ष इतका खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.

ई-निविदे द्वारे प्राप्त झालेले मे.रेयान इंटरप्रायजेस, अंबरनाथ.यांनी सर्व खर्च भागवून मनपा हिस्सा ५५% व संस्थाचा हिस्सा ४५ % करिता एका वर्षाच्या कालावधी खर्च सादर केला आहे.

सद्यास्थिती भिवंडी मनपाच्या कार्यक्षेत्रात स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती करुन दंडात्मक कार्यवाही करणेसाठी मनपाचे मनुष्यबळ कमी पडत असल्याने ई-निविदे द्वारे प्राप्त झालेले मे.रेयान इंटरप्रायजेस, अंबरनाथ.यांनी सर्व खर्च भागवून मनपा हिस्सा ५५% व संस्थाचा हिस्सा ४५ % - असा दर सादर केला असुन सादर आहेत.सद्यास्थिती सादर केलेल्या निविदाकारास व खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. ८६ दि. ३०/ ०९ /२०२३

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी प्रमाणे शहर क्षेत्रातील दंडात्मक कारवाई करणेसाठी ऑन्लाईन निविदे द्वारे प्राप्त झालेले निविदाकार व निविदाकार यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विनंती आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ)व १(ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उपविधी प्रमाणे शहर क्षेत्रातील दंडात्मक कारवाई करणेसाठी संस्थेना सादर केलेल्या खर्चानुसार मनपा हिस्सा ५५% व संस्थेचा हिस्सा ४५ % प्रशासनाने प्रस्तावित केल्यानुसार मे.रेयान इंटरप्रायजेस, अंबरनाथ यांनी ऑनलाईन निविदे मध्ये सर्व खर्च भागवून संस्थेचा हिस्सा ४५ % मनपा हिस्सा ५५% अशी सादर केली असुन सादर केलेल्या खर्चास व निविदाकारास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**